श्री.एम.एम.दिवे,तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक (लेखा)
ए.बा.वि.से.यो.श्रीगोंदा जिल्हा परिषद अहिल्यानगर
यांच्या निलंबन कालावधीच्या निर्णयाबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

अर्थ विभाग

जिल्हा परिषद आदेश क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/ ११८ /२०२५

अहिल्यानगर,दिनांक - १९/०३/२०२५

संदर्भ:- १. इकडील दोषारोप पत्र क्र. अर्थ/का-१/आस्था-१/२३४/१२ दि. ११/०९/२०१२
२.इकडील निलंबन आदेश अर्थ विभाग क्र वशि/का-१/आस्था-१/१०५/११ दि.२१/०३/२०११
३. तुमचा लेखी खुलासा दिनांक २५/१०/२०१२
४. इकडील अंतिम नोटीस जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/२७३ /२०२३ दिनांक ०२/०८/२०२३
५.इकडील नोटीस जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/२७४ /२०२३ दिनांक ०२/०८/२०२३

तुम्ही ,तत्कालीन वेळी वरिष्ठ सहाय्यक (लेखा), या पदावर एकात्मिक बालविकास प्रकल्प सेवा योजना श्रीगोंदा या कार्यालयात कार्यरत असताना कार्यालयीन कामी अनधिकृत रित्या गैरहजर राहुन कार्यालयीन कामी गैरवर्तन व हलगर्जीपणाबाबत केल्याने तुम्हास संदर्भ क्रं.२ अन्वये च्या आदेशान्वये आदेशाच्या दिनांकापासून सेवा निलंबीत करण्यात आले होते.आपण अनाधिकाराने स्वतः च्या अधिकारात कार्यालयीन कामी गैरहजर राहुन कार्यालयीन कामी गैरवर्तन व हलगर्जीपणा केलेबाबत संदर्भ क्रमांक १ अन्वये दोषारोपपत्र बजावणेत आलेले होते. सदर दोषारोप पत्राचा खुलासा तुम्ही अमान्य केलेला आहे.तसेच त्याबाबत शिक्षा अंतिम करणेकामी देणेत आलेल्या संदर्भ क्रमांक ४ चे अंतिम कारणे दाखवा नोटीसलाही आपण विहित मुदतीत/अदयाप उत्तर सादर केलेले नाही.

वरिल सर्व पार्श्वभुमीवर श्री.एम.एम.दिवे, तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचा दिनांक २१/०३/२०११ ते दिनांक ३१/०५/२०१२ एकुण ०१ वर्ष ०२ महिने १० दिवस (एकुण ४३६ दिवस) या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधिन होती. प्रस्तुत बाबत या कार्यालयाने दिलेल्या संदर्भ क्रमांक ५ चे नोटीसला आपण उत्तर दिलेले नाही.सबब याबाबत आपले काही एक म्हणणे नाही असे समजण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने श्री.दिवे हे अनाधिकाराने स्वतः च्या अधिकारात अनधिकृतरित्या गैरहजर असल्याने त्यांचे सेवा निलंबन समर्थनीय ठरत असल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम ३ व ५ नुसार सेवा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ सेवा निलंबन कालावधी म्हणून धरणे समर्थनिय ठरत आहे.

त्यानुसार मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ पोटनियम ३ व ५ नुसार श्री.एम.एम.दिवे, तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचा दिनांक २१/०३/२०११ ते दिनांक ३१/०५/२०१२ एकुण ०१ वर्ष ०२ महिने १० दिवस (एकुण ४३६ दिवस) हा सेवा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ सेवा निलंबन कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३१९०५००१५ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yereka
Date: 19-03-2025 14:06:2

(आशिष येरेकर,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.एम.एम.दिवे ,तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक (लेखा),ए.बा.वि.से.यो.श्रीगोंदा जि.अहिल्यानगर

द्वारा :- बालविकास प्रकल्प अधिकारी,ए.बा.वि.से.यो.श्रीगोंदा

२/- सदरचा आदेश संबंधितांस बजावून बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.सदर आदेशाची नोंद संबधिताचे मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- निवडनस्ती.